## संक्षिप्त वृत्त



पिलीव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे नुतन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य.

### पिलीव जि.प. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी अमोल गांधी

**पिलीव** : पिलीव (ता.माळशिरस) येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अमोल गांधी यांची तर उपाध्यक्षपदी प्रियांका रजपुत यांची सर्वोनुमते बिनविरोध निवड करण्यात आली. नवीन शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यासाठी रविवारी (दि.१४) सर्व पालकांची बैठक पार पडली. यावेळी अध्यक्ष, उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. सदस्यपदी नानासाहेब मदने, अनंता जामदार, श्याम उपाध्ये, सोहेल बागवान, सचिन मदने, उज्वला पिसे, स्नेहल लेंगरे, करीश्मा शेख, अश्विनी वगरे, शोभा वाघमारे, शिक्षण तज्ज्ञ म्हणून समशेरशिंग रजपुत, सचिव - विजयकुमार साळुंखे यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आल्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष ॲड. वैभव मेथवडे तसेच पालक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नुतन अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. पोपट धनवडे यांनी सुत्रसंचालन केले.

### पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याची मागणी

**सांगोला** : पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करावे अशी मागणी सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार शहाजीबापू पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पंढरपूर, सांगोला व मंगळवेढा या तीन तालुक्यांकरिता स्वतंत्र पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (उपविभागीय आरटीओ ऑफिस) मंजूर करावे. सोलापूर व अकलूज येथील कामकाजाचा अधिक भार असल्याने या ग्रामीण भागातील लोकांची वेळेत कामे पूर्ण होत नाहीत. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात प्रत्येकी तीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कार्यरत आहे, सोलापूर जिल्ह्याची व्याप्ती पाहता या तीन तालुक्यांकरिता पंढरपूर येथे स्वतंत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गरजेचे आहे. तिन्ही तालुक्यातील लोकसंख्या व वाहनधारकांची संख्या लक्षात घेता पंढरपूर हे २५-३० किलोमीटरच्या अंतरावर आहे. पंढरपूर हे मोठे तीर्थक्षेत्र आहे व या तिन्ही तालुक्यांना ही मध्यवर्ती ठिकाण नजीक असल्याने नागरिकांचा वेळ व होणारा खर्चाचा अपव्यय थांबणार आहे. या ठिकाणी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयस तात्काळ मंजुरी मिळावी. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात महापूजेला आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी याबाबत घोषणा करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

### दक्षिणमधून काँग्रेसने धनगर समाजालाच उमेदवारी द्यावी

**सोलापूर** : राज्यात धनगर समाजाची लोकसंख्या दोन कोटी इतकी असून काँग्रेस पक्षाकडून या समाजास जनगणनेच्या अहवालानुसार विधानसभेचे तिकीट देण्यात यावे. सोलापूर जिल्ह्यात धनगर समाज बहुसंख्येने असून त्याला विधानसभेचे तिकीट देताना डावलले जाते. यामुळे धनगर समाजात असंतोष पसरलेला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत धनगर समाजात विधानसभेचे तिकीट दिले गेले नाही तर विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षास फार मोठे नुकसान सहन करावे लागेल. दक्षिण सोलापूर मतदारसंघातून धनगर समाजास उमेदवारी द्यावी या मागणीसाठी २१ जुलै रोजी भंडारकवठे ग्रामदैवत पिरमहासिद्ध यांचे दर्शन घेऊन सह्याची मोहीम राबविली जाणार आहे, असे सिद्राम चोपडे, अप्पाराव हाके, व रावसाहेब व्हनमाने यांनी म्हटले आहे.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण सन्मान यात्रेला आजपासून पंढरपूरमधून प्रारंभ

## डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते उद्घाटन

**सोलापूर/प्रतिनिधी**

**स्त्री आणि पुरुष यांच्या विकास दरातील विषमता दूर करण्यासाठी, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करुन आत्मसन्मानाने जगता यावे,यासाठी केंद्र व राज्य शासनाने दूरदृष्टी ठेवून या महिलांसाठी विविध योजना योजना आखल्या असून या योजनांची माहिती तळागाळातील महिला व विद्यार्थिनींपर्यंत पोहोचावी, यासाठी वारी विठ्ठल रखुमाईची, योजना लाडक्या बहिणींची ही घोषणा करुन राज्यभर मुख्यमंत्री लाडकी बहीण सन्मान यात्रा सोमवारपासून पंढरपूरमधून प्रारंभ होत आहे. शिवसेनेच्या नेत्या डॉ.निलम गोऱ्हे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असल्याची माहिती शिवसेनेच्या (शिंदे गट) प्रवक्त्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे व शिवसेना अध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष ह.भ.प.अक्षय महाराज भोसले यांनी दिली.**





शिवसेना महिला आघाडी आणि अध्यात्मिक सेनेच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री लाडकी बहीण सन्मान यात्रेचे आयोजन केले आहे. सोमवारी सायंकाळी सहा वाजता पंढरपूर येथील संत मुक्ताबाई मठात या यात्रेचे उद्घाटन डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते होणार असल्याचे सांगून प्रा.डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या, महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या हितासाठी अह-ोरात्र जीव ओतून काम करणारे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने महिला व विद्यार्थिनींच्या हितासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, अन्नपूर्णा योजना, मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण, महिलांना एस.टी.बसमध्ये अर्धे तिकिट अशा क्रांतिकारी योजना सुरु केल्या आहेत. राज्यातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या पाहिजेत. मुलींना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी डॉ. नीलम गोऱ्हे पहिल्यापासून आग्रही आहेत. महिला सक्षमीकरणाची त्यांना तळमळ होती. त्यांचे स्वप्न सत्यात उतरल्यामुळे त्यांच्या हस्ते या यात्रेचे उद्घाटन ठेवले आहे.

रुग्णांना उपचारासाठी उशीर लागू नये, त्यांना तात्काळ मदत मिळावी, यासाठी वैद्यकिय मदतीच्या फाईलवर ना.शिंदे हे अगदी प्रवासात आणि रात्रीही सह्या करतात. स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी आपद्ग्रस्त भागांना भेटी दिल्या आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतून वय वर्षे २१ ते ६५ मधील पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर दरमहा एक हजार ५०० रुपये जमा होणार आहेत. त्यासाठी राज्य शासनाला ४५ हजार कोटी रुपयाचा खर्च येणार आहे. मुलींना मोफत उच्च शिक्षण देणारे महाराष्ट्र हे देशा-तील पहिले राज्य ठरले आहे. या योजनेतून २ लाख विद्यार्थिनींची ६०० अभ्यासक्रमाची संपूर्ण फी माफ होणार आहे. यासाठी शास-नाला दोन हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. जगभरातून लाखो भाविक पंढरीच्या वाटेवर आ-हेत. त्याच विठ्ठलाला साक्षी ठेवून मुख्यमंत्री शिंदे यांना राज्यातील सामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासाची आस लागली आहे. यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण सन्मान यात्रेला पंढरपूरमधून सुरुवात होत आहे. ही सन्मान यात्रा महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात, जिल्ह्यात जाऊन महिलांशी, विद्यार्थिनींशी संवाद साधणार आहे. राज्यातील एकही महिला व विद्यार्थिनी या योजनेपासून वंचित राहू नये, हीच या यात्रेमागची संकल्पना आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, ह.भ.प. अक्षय महाराज भोसले यांनी केले आहे.

## दामाजी कारखान्यातर्फे संतांच्या दिंड्यांचे स्वागत

**मंगळवेढा** : श्री संत गजानन महाराज शेगाव व संत सेवालाल महाराज विंचूर या पालख्यांचे मंगळवेढा नगरीत रविवारी (दि.१४) श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यातर्फे स्वागत करण्यात आले.



मंगळवेढा : श्री संत गजानन महाराज पालखीचे दामाजी कारखान्यातर्फे स्वागत करण्यात आले.

संत गजानन महाराज पालखीचे सकाळी आगमन झाले. श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यातर्फे

पालखीचे मंगळवेढा शहरात आगमनावेळी कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, व्हाईस चेअरमन तानाजी खरात, सर्व संचालक मंडळ तसेच प्र कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी पुष्पहार घालून मोठया उत्साहात दिंडीचे स्वागत केले. तसेच पालखीस्थळावर विसाव्याचे ठिकाणी कारखान्याचे संचालक मुरलीधर दत्तु व त्यांच्या पत्नी अरुणा दत्तु या उभयतांच्याहस्ते श्रींची आरती करण्यात आली.

यावेळी दिंडीतील वारकऱ्यांना कारखान्याच्यावतीने मंगळवेढा नगरपरिषदेच्या अभ्यासिका हॉलमध्ये मिष्ठान्न भोजन देवून निरोप देण्यात आला. तसेच विंचूर व शंकरनगर येथील श्री संत सेवालाल महाराज व तुकाराम महाराज यांच्या दिंडीचे स्वागत करुन दिंडीतील वारकऱ्यांना कारखान्यातर्फे मिष्ठान्न भोजन देवून रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली. याप्रसंगी कारखान्याचे संचालक सर्वश्री मुरलीधर दत्तु, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणु पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजद-ार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, अशोक केदार, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर यांचेसह कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक रमेश जायभाय, मुख्य शेती अधिकारी कृष्णात ठवरे, चिफ अकौंटंट रमेश गणेशकर, कार्यालय अधीक्षक दगडू फटे, प्र.लेबर ऑफिसर आप्पासाो शिनग-ारे, स्टोअरकिपर उत्तम भुसे, सुरक्षा अधिकारी लक्ष्मण बेदरे, असि. पर्चेस ऑफिसर संदिप इंगोले, केनयार्ड सुपरवायझर प्रकाश पाटील, कामगार संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल गायकवाड, कामगार पतसंस्थेचे चेअरमन विश्वास सावंजी, कारखान्यातील कामगार, सभासद, शेतकरी उपस्थित होते.

## चाळीस दिंड्यांचा पिलीव परिसरात मुक्काम हरिनामाच्या गजराने दुमदुमली नगरी

**पिलीव/प्रतिनिधी**

पंढरपूरला दरवर्षी जवळपास ४० दिंड्या पिलीव गावातून सातारा, पुणे, कोल्हापूर जिल्ह्यातील दिंड्या चालत जातात. या सर्व पालख्यांचा मुक्काम सुळेवाडी, पिलीव, कुसमोड, झिंजेवस्ती व आसपासच्या गावात असतो.



पिलीव : ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या पालखीचे स्वागत करताना अविनाश जेऊरकर व अनिता जेऊरकर आदी.

पिलीव गावातून ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, सेवागिरी महाराज, हरिहर बाबा घाडगे महाराज, बत्तीस शिराळा येथील दिंडी,गोरक्षनाथ पालखी सो-हळा, इंचगिरी, शेकोबादादा, बोधे महाराज, रावसाहेब लोहार दिंडी सोहळा, ज्ञानोबा महाराज पालखी, सदगुरु सेवा मंडळ, कन्हेरे माऊली दिंडी सोहळा ,यापैकी बऱ्याच पालख्या पिलीव गावात मुक्कामी असतात. यावेळी प्रवचन, भजन किर्तन, भारुड या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रबोधन केले जाते.

५६ वर्षांपेक्षा जास्त परंपरा असणाऱ्या ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या पालखीचे पिलीव बसस्थानकावर अविनाश जेऊरकर व ग्रामपंचायत सदस्या अनिता जेऊरकर कुटुंबीयांच्या वतीने ताशाच्या गजरात तसेच फटाक्यांची आतषबाजी करीत मोठ्या उत्साहात स्व-ागत करण्यात आले. यावेळी जेऊरकर कुटुंबीयांच्या वतीने संत पुजन, दिंडीत योगदान दिलेल्या व्यवस्थापक, बैलगाडी चालक मालक, चोपदार, तुळ-शी वृंदावनधारक महिला व पालखीतील इतर मुख्य अतिथींचा जेऊरकर कुटुंबीयांच्या वतीने सत्कार करण्यात आला. पिलीव परिसरातील अनेकांनी यावेळी पालखीतील वारकऱ्यांनसाठी अन्नदान तसेच चहा ,नाष्टा इत्यादींची सोय करीत वारकऱ्यांचे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी आदरातिथ्य केले. ग्रामपंचायतीने वारकऱ्यांना सर्व सोयी सुविधा पुरविल्या. महावितरणच्या वतीने अखंडित वीजपुरवठा केला.

## जनजागरण रॅलीसाठी मराठा समाजाची बैठक

**सोलापूर/प्रतिनिधी**

सकल मराठा समाज सोलापूर शहर जिल्हयातील सर्व तालुके आणि शहर सोलापूर येथील प्रमुख मराठा बांधवांची बैठक रविवारी (दि.१४) छ. शिवाजी प्रशाला येथे पार पडली.

बैठकीमध्ये मोहोळ, बार्शी ,मंगळवेढा, माढा, पंढरपूर, सांगोला ,माळशिरस, करमाळा, अक्कलकोट, ता. दक्षिण आणि उत्तर तालुक्यातून मराठा बांधव उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रा. गणेश देशमुख यांनी बैठकीमागचा उद्देश सांगितला. जनजागरण शांतता रॅलीमध्ये संपूर्ण जिल्ह्याचा सहभाग असावा म्हणून सकल मराठा समाज सोलापूर जिल्हा कमिटी जिल्ह्याचा दौरा करणार असून ज्या दिवशी जरांगे पाटील रॅलीची तारीख घोषित करतील त्याच दिवसापासून कमिटी दौरा आखेल, असे सांगितले. माऊली पवार म्हणाले की 'मराठ्यांचा ओबीसी मध्ये समावेश करावाच लागेल. जर नाही केला तर लोकसभेला जसा दणका दिला तसाच विधानसभेला दाखव-ला जाईल. रॅलीची सभा शिवाजी चौकात स्टेज मारून, संभाजी महाराज चौकातून शिवाजी महाराज चौकापर्यंत रॅली होईल. राजन जाधव यांनी शिस्तीविषयी मार्गदर्शन केले. विजय राऊत यांनी बार्शी तालुक्याप्रमाणे कुणबी दाखले इतर तालुक्यातून दाखले काढावे असे आव्ह-ान केले, या प्रसंगी करमाळ्याचे रामदास झोल, सचिन कदम ,उदयसिंह पाटील, महेश पवार, रणजित कदम, निर्मला शे-लावने यांनी विचार व्यक्त केले.

बैठकीत पुरुषोत्तम बर्डे, माऊली पवार, प्रा. गणेश देशमुख, राजन भाऊ जाधव, नाना काळे, श्रीकांत डांगे, श्रीरंग लाले, महेश पवार, रामदास झोल, विजय राऊत, सचिन काळे, निर्मला शेलवणे, संजीवनी मुळे, मनीषा नलावडे,प्राजक्ता अजिंक्य पाटील, बाळासाहेब मोरे, प्रकाश ननवरे, नाना चव्हाण, शंभुराजे जगताप, रणज-ितसिंह शिंदे, शिवाजी चापले, रणजित कदम, प्रा. संजय जाधव, अमोल भोस-ले, आबा सावंत, उदय देशमुख, सुरेश जगताप, संजय साळुंखे, आबा नवगिरे, सौरभ साळुंखे, पिंटू माने,प्रशांत देशमुख, विश्वास चव्हाण, गणेश भोसले आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांनी मुलींच्या मोफत शिक्षणाचे दरवाजे उघडले : आ. शहाजीबापू

**सांगोला** : जनतेसाठी हितासाठी संवेदनशील असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुलींच्या मोफत शिक्षणाचे दरवाजे उघडले असल्याचे मत आ. शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

मोलमजुरीसाठी परराज्यांत गेलेल्या धर्मा पवार यांचे कुटुंब लॉकडाऊनमध्ये परभणी जिल्ह्यातील सेलूला परतले. पण हलाखीच्या परिस्थितीने शिक्षणासाठी पैसे नसल्याने पूनम पवार हिने आत्महत्या केली. ही बातमी मुंबईत पोहोचली अन् थेट मुख्यमंत्री शिंदे यांनी दखल घेतली.ते या घटनेने व्यथित झाले. महायुती सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत मुलींना शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला. याबाबतचे आदेश उपसचिव सतीश तिडके यांच्या स्वाक्षरीने निघाले आहेत. ५ जुलै रोजी राज्य मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

निर्णयामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग आणि इतर मागास वर्गमधील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शैक्षणिक खर्चाचा शंभर टक्के भार शासन उचलणार आहे. ८ जुलैच्या शासन निर्णयानुसार ज्यांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी आहे. अशा पात्र मुलींची १०० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती व परीक्षा फीचा लाभ शासन मंजूर करणार आहे. हे फक्त जनतेच्या हिताचे निर्णय घेणाऱ्या महायुती सरकारमुळे शक्य झाले असल्याचे आ. शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

## साक्षरता वारीत शिक्षणाधिकाऱ्यांची फुगडी

### चैतन्यवारी समवेत 'वारी साक्षरतेची' अन् असाक्षरांची नोंदणी

**अकलूज** : उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत योजना शिक्षण संचालनालय आयोजित 'वारी साक्षरते'ची या अनुषंगाने राज्यभर विविध उपक्रम सुरू आहेत. माळशिरस तालुक्यात माळीनगर व वेळापूर येथे शिक्षण उपसंचालक राजेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत साक्षरतेचा जागर करण्यात आला. साक्षरता वारीत उपसंचालक क्षीरसागर, शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांच्यासह उपस्थितांनी फुगडीच्या पारंपरिक खेळाचा आनंद घेतला.



अकलूज : साक्षरता वारीत फुगडी खेळताना अधिकारी वर्ग.

> दोन्ही प्रमुख पालखी मार्गावर साक्षरतेच्या रथाद्वारे जागृती करत आहेत. तसेच असाक्षर नोंदणी करण्यात येत आहे. पंढरपूर येथे आषाढी वारीपर्यंत ही जागृती सुरू ठेवण्यात येईल. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आलेल्या असाक्षर वारकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे.
>
> **–राजेश क्षीरसागर, राज्य शिक्षण उपसंचालक पुणे**

सकाळी माळीनगर येथे मुख्य रस्त्यावर मॉडेल विविधांगी प्रशालेच्या बालचमूने बाळासाहेब सोनवणे, राजेश कांबळे, संजय बांदल यांच्या मार्गदर्शनाखाली साक्षरता दिंडी काढली. राज्य योजना शिक्षण उपसंचालक राजेश क्षीरसागर, योजना शिक्षणाधिकारी सुलभा वठारे आणि साक्षरता रथातील सदस्यांचे स्वागत प्राचार्य कलाप्पा बिराजदार यांनी केले. साक्षरता दिंडीत शिक्षक, नागरिक, योजना संचालनालयाचा साक्षरता रथही सहभागी झाला होता. केंद्र शासनाने दखल घेतलेल्या टोणेवाडी (ता. बार्शी) येथील सुशीला व रुचिता या आजी-नातीचे, सातारच्या बबई मस्कर यांची छायाचित्रे, रत्नागिरीच्या अनन्या चव्हाण हिची कलाकृती,उल्लास कार्यक्रमाची माहिती व वैशिष्ट्ये साक्षरता रथावर दर्शवली होती. रथामागील व पुढील सर्व दिंड्यांमधील वारकऱ्यांसह सर्वांचे स्वागत घोषणा व साक्षरता गीतांनी झाले.

तालुक्यातील विविध शाळांमध्ये बाल वारकऱ्यांची साक्षरता दिंडी निघाली. रमेश कवितके, लव गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर तर संभाजी देशमुख, कापसे यांच्या नेतृत्वाखाली संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर रथाद्वारे साक्षरतेचा जागर केला.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील रथामागील दिंडी क्रमांक २७९ ते ३७८ या दिंड्यांमधील असाक्षर वारकऱ्यांची नोंदणी अकलूज व माळीनगर परिसरातील शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी दिंडीत मुक्कामाच्या ठिकाणी जाऊन केली.

## जनसन्मान सभेला राष्ट्रवादीचे नेते, कार्यकर्ते रवाना

### मोठ्या संख्येने वाहनांच्या ताफ्यासह बारामतीला प्रस्थान

**सोलापूर/प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, राज्यातील राष्ट्रवादीचे सर्व मंत्री, सर्व आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत बारामती येथे जनसन्मान महामेळाव्याचे आयोजन केले आहे. महामेळाव्यात सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते बस आणि चारचाकी वाहनांनी बारामतीकडे रवाना झाले.





सोलापूर : बारामतीकडे महामेळाव्यासाठी रवाना होताना संतोष पवार यांच्यासह कार्यकर्ते.

मिशन मैदान टी सी कॉलेजशेजारी बारामती येथे हा जनसन्मान महामेळावा होणार आहे. मेळाव्याला सोलापुरातून प्रमुख नेते व मोठ्या संख्येने कार्यकर्ते जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या नेतृत्वात बारामतीला रवाना झाले. मेळाव्यासाठी सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जोरदार तयारी केली आहे.

या वेळी जिल्हा समन्वयक आमदार यशवंत माने, जिल्हाध्यक्ष संतोष पवार, जुबेर बागवान,प्रमोद भोसले, बिज्जु प्रधाने, अनिल उकरंडे, बाबाराजे भोसले, सुरेश तोडकरी, ॲड.सलीम नदाफ, संगीता जोगधनकर, चित्रा कदम, सायरा शेख, मंदाकिनी तोडकरी, सुहास कदम, कार्याध्यक्ष तुषार जक्का, किरण माशाळकर, प्रकाश जाधव, अमीर शेख, संजय मोरे, अलमेहराज आबादीराजे, विकास हिरेमठ, रुपेश भोसले, इरफान शेख,अनिल बनसोडे, अनिल छत्रबंद, कार्याध्यक्ष बाबू पटेल, शहराध्यक्ष आशुतोष नाटकर, नागेश निंबाळकर वैभव गंगणे, सोमनाथ शिंदे,सुजित अवघडे,शामराव गांगर्डे,विनय रायकर सिध्देश्वर अंबट, संदिप चव्हाण, सुरेश तोडकरी, सरफराज बागवान, तौकिर शेरी मोहसीन, मुजावर मुजफ्फर बागवान,प्रिया पवार, कार्याध्यक्ष कांचन पवार, सुरेखा घाडगे,महेश कुलकर्णी, प्रज्ञासागर गायकवाड प्रकाश शिंदे,कुमार झगडेकर, दशरथ शेंडगे ,याकूब नवगिरे, शांतराज जंगम, मुसैफ बागवान, डेविड कुराडे, जॉन दिनकर,मनोज काशीद, धनंजय जाधव, आशिष म्हैत्रे, किरण आवताडे, दिनेश पवार, बसवराज सारवाडकर ,शरद येच्चे,सागर भोसले, पृथ्वीराज माने, सौरभ माने,संकेत क्षीरसागर ,अजय सोनवणे,किरण नलावडे,सुजित तोडकरी अमोल डोळे राजू पवार प्रकाश झाडबुके राजू चव्हाण, मोलाली शेख, मैनुद्दीन इनामदार ,मोबिन बेलमे,बबन हक्के संतोष वेळापुरे आदी उपस्थित होते.